महाराष्ट्र शासन
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल,
गट क्र.३ जालना - ४३१२०३

दुरध्वनी क्र.:-०२४८२-२३०९०२
फॅक्स क्र. :-०२४८२-२३०९०२
ईमेल:- cmdt.srpf3.jalna@mahapolice.gov.in

---

राज्य राखीव पोलीस बल गट क्र.३ जालना सशस्त्र पोलीस शिपाई भरती सन-२०२२-२३

**लेखी परिक्षेकरीता पात्र उमेदवारांना सुचना**

१) राज्य राखीव पोलीस बल गट क्र.३ जालना या आस्थापनेवर सन-२०२२-२०२३ मध्ये रिक्त असलेल्या २४८ पदाकरीता पोलीस भरती २०२२-२०२३ आयोजीत करण्यात आली आहे. त्यानुसार लेखीपरिक्षेकरीता १:१० प्रमाणे एकुण ४७२७ उमेदवार पात्र झाले आहेत.

२) **सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२२-२३ लेखी परिक्षा दिनांक ११.०८.२०२४ रोजी ११.०० वाजता घेण्यात येणार असुन त्याबाबतचे प्रवेशपत्र महा-आयटी कंपनी मुंबई यांचेकडुन उमेदवारांना वाटप करण्यात आले आहे. त्या प्रमाणे उमेदवारांना परिक्षा केंद्रावर सकाळी ०६.०० वाजता हजर रहाणे अनिवार्य आहे. सकाळी ०६.०० वाजेनंतर परिक्षाकेंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना परिक्षाकेंद्राच्या आत प्रवेश देण्यात येणार नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

३) लेखी परिक्षेकरीता येणाऱ्या उमेदवारांनी महा-आयटी यांनी दिलेले लेखी परिक्षाबाबतचे प्रवेशपत्र तसेच मैदानी चाचणीच्या वेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र उमेदवारांकडे असतील तरच परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येईल.

४) उमेदवारांचे स्वत:चे वैध फोटो आयडी (उदा.पॅन कार्ड,आधारकार्ड,मतदान कार्ड, वाहन चालक परवाना ई.)सोबत असणे अनिवार्य आहे.

५) उमेदवार यांनी कोणत्याही प्रकारचे पेन, मोबाईल फोन, डिजीटल वॉच, डायरी,मायक्रो फोन, ईअर फोन किंवा कोणत्याही प्रकारचे ईलेक्ट्रॉनिक डिव्हाईस तसेच नोट्स व पुस्तके परिक्षा केंद्राच्या आत सोबत घेऊन येता येणार नाही याची नोंद घ्यावी. तसे आढळुण आल्यास भरती प्रक्रियेमधुन अपात्र करण्यात येईल.

६) उमेदवारांनी परिक्षाकेंद्रामध्ये एकदा प्रवेश केल्यानंतर परिक्षा संपेपर्यंत कुठल्याही परिस्थितीमध्ये परिक्षा केंद्राच्या बाहेर जाता येणार नाही याची नोंद घ्यावी.

७) परिक्षा केंद्राच्या अवारात मित्र, नातेवाईक, पालक व अन्य अनधिकृत व्यक्तीस प्रवेश देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८) लेखी परिक्षेकरीता येतांना उमेदवारांनी स्वत:चे दोन पासपोर्ट साईज छायाचीत्र सोबत आणावे.

९) परिक्षा केंद्रावर अथवा परिक्षाकेंद्राच्या परिसरात कुठलाही अनुचित प्रकार घडनार नाही या करीता परिक्षा केंद्रावर खोलीनिहाय व्हीडीओ रेकॉर्डीग तसेच CCTV रेकॉर्डीग करण्यात येणार आहे. तसेच ओळख पटविण्याकरीता प्रत्येक उमेदवारांची बायोमॅट्रीक्स घेण्यात येणार असुन डमी उमेदवार आढळुन आल्यास तसेच परिक्षेदरम्यान गैरवर्तन आढळुन आल्यास उमेदवारास लेखी परीक्षे करीता अपात्र ठरविण्यात येईल व योग्य ती आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१०) राज्य राखीव पोलीस बल गट क्र.३ जालना या गटाच्या लेखी परिक्षेकरीता बैठक व्यवस्थाही चेस्ट नंबर प्रमाणे नसुन बैठक क्रमांक नुसार आहे. तसेच उमेदवारांना देण्यात आलेला बैठक क्रमांक व चेस्ट नंबर उमेदवारांच्या हॉलतीकीटवर खालील प्रमाणे दर्शविण्यात आले आहेत. (उदा.चेस्ट क्रमांक :- 6100 - 15450)

| | | | |
|---|---|---|---|
| **चेस्ट क्रमांक. :-** | **6100** | **-** | **15450** |

↑ **बैठक क्रमांक** ↑ **चेस्ट क्रमांक**

**११) लेखी परिक्षेदरम्यान उमेदवार आपसात बोलतांना आढळल्यास सदरचा प्रकार नकल करत असल्याचे समजुन दोन्ही उमेदवारांना त्याक्षणीच पुढील पुर्ण प्रक्रियेकरीता अपात्र ठरविण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

७/८/२०२४

(उज्वला वनकर)
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.३ जालना.

Office of the Commandant S.R.P.F. Gr. III * JALNA *